मुंबई विद्यापीठ

क्रं. घ.म./ ६ / २०१३ - २०१४

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, सह-संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, चे कार्यालयीन पत्र क्र. सहस/उशि/मुवि/कॅ.मोबा/२०१३/६४७ दिनांक १३ मे, २०१३, व ग.स. कचरे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे पत्र क्र. संकीण २०१३/(५६/१३)/म.शि.३, दिनांक १५ फेब्रुवारी २०१३, अन्वये विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या महाविद्यालयांमध्ये कॅमेरा मोबाईल वापरास बंदी घालणे संबंधी संपूर्ण महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था तसेच महाविद्यालयांना मोबाईल जॅमर किंवा डिकोडर लावणे सक्तीचे करणेबाबत प्राचार्यांचे, प्राध्यापकांचे अभिप्राय घेवून संचालनालय, मंत्रालय, मुंबई व सह-संचालक उच्च शिक्षण, मुंबई विभाग, यांना सादर करावेत व एक प्रत विद्यापीठास अग्रेषित करावी. सदर कार्यवाहीचे फायदे तोटे दोन्ही मुद्दयांवर माहिती देण्यात यावी.सोबत शासन निर्णयाच्या प्रती जोडल्या असून सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे महाविद्यालयस्तरावर पुढील कार्यवाही करावी, ही विनंती.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २५ जून २०13

कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव / संचालक यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीसाठी रवाना :-

१. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
२. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
३. सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
४. सह संचालक, पनवेल विभाग, पनवेल, जिल्हा - रायगड.
५. ग.सं. कचरे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
६. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, प्र-कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
८. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
९. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
१०. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

कुलसचिव

महाराष्ट्र शासन
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

इं-मेल - Jd@jdhemumbai.org.in दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६५६६००

क्र.सहसं /उशि /मुवि /कॅ.मोबा/२०१३/ ८८४७ दिनांक - १०/०५/२०१३

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECD/201 /
13 MAY 2013
5821

प्रति,

१) कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

२) कुलसचिव,
एस.एन.डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

विषय - महाविदयालयामध्ये कॅमेरा मोबाईल वापरास बंदी घालणे संबंधी संपूर्ण महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था तसेच महाविदयालयांना मोबाईल जॅमर किंवा डिकोडर लावणे सक्तीचे करणेबाबत.

संदर्भ - १) शासनपत्र क्र. संकीर्ण २०१३/(५६/१३)/म.शि.३, दिनांक १५/०२/२०१३.
२) संचालनालयाचे पत्र क्र.अमवि/मवि-२/२०१३/५६/३०५०४/२०३४ दि.०३/०५/२०१३.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार श्री. अशोक सं. लाड, शहर संघटक, राष्ट्रवादी युवक कॉग्रेस, औरंगाबाद शहर यांनी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांना सादर केलेल्या पत्राच्या प्रती या सोबत जोडल्या आहेत. तसेच सदर पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याविषयी कळविले आहे.

महाराष्ट्रात सायबर क्राईम मोठया प्रमाणात वाढत आहे. यामध्ये कॅमेरा मोबाईलचा गैरवापर देखील फार मोठया प्रमाणात होत आहे. हया प्रकारावर आळा घालण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील महाविदयालये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये मोबाईल जॅमर किंवा डिकोडर लावणे सक्तीचे करावे. अशी मागणी केलेली आहे. (1)

तरी सदर मागणीबाबत प्राचार्यांचे, प्राध्यापकांचे अभिप्राय घेवून संचालनालयास सादर करावेत व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी. (2) तसेच सदर कार्यवाहीचे फायदे तोटे दोन्ही मुदयावर माहिती देण्यात यावी. (3)

आपली विश्वासु,

(सही)

सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

प्रत माहितीस्तव सादर,
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.